पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• वर्ष २ रे • अंक : २३ • ऑगस्ट २००९ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती – www.punecorporation.org

## गाणी सफाई सैनिकांची सीडीचे मा. आयुक्त यांचे हस्ते प्रकाशन

पुणे महानगरपालिका कामगार युनियन निर्मित गाणी सफाई सैनिकांची या सीडीचे प्रकाशन दिनांक २४/८/२००९ रोजी सायंकाळी ६.०० वाजता श्रमिक भवन, शिवाजीनगर, पुणे येथे मा. श्री. महेश झगडे, महापालिका आयुक्त यांच्या शुभ हस्ते झाले. या प्रसंगी प्रसिध्द माहितीपट दिग्दर्शक अतुल पेठे, जिंगल फिल्म्स निर्माते भाई डोळे, फोटोग्राफर सुरेंद्र रानडे, श्रमिक कला पथकातील सर्व कलाकार, कामगार संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या आगळ्यावेगळ्या कार्यक्रमामध्ये मा. महापालिका आयुक्त यांनी श्रमिक कला पथकातील सर्व कामगार कलाकारांचा पुष्पगुच्छ



देवून सत्कार केला.

दिनांक १० डिसेंबर, २००८ युनियन वर्धापन दिनाच्या दिवशी कामगार संघटनेने ओला- सुका कचरा वेगळा करा अभियान पुढील एका वर्षासाठी राबविण्याचा संकल्प सोडला आहे. या अभियानांतर्गत युनियन संलग्न कला पथक शहरातील सार्वजनिक ठिकाणी, सहकारी सोसायट्या, झोपडपट्टी परिसर, इत्यादी ठिकाणी जावून पथनाट्याद्वारे नागरिकांना ओला-सुका कचरा वेगळा करा, स्वच्छता राखा यासाठी गाण्याच्या माध्यमानी आवाहन करत आहेत. श्रमिक कला पथकातील कामगार कलाकार यांनी स्वत: गायलेली, रचलेली व चाली लावलेल्या गाण्यांचे शहरात गेली ८-९ महिने विविध ठिकाणी कार्यक्रम होत आहेत. अनेक गणेश उत्सव मंडळांनी ही गाणी सीडीच्या रुपात उपलब्ध झाल्यास आपण ती गणेश उत्सवात लावू अशी मागणी युनियनला केली. सीडीच्या रुपात ही गाणी आल्याने नागरिकांना सार्वजनिक स्वच्छता आणि त्याचे महत्व या बाबतचा मोठा फायदा होणार असल्याने कामगार संघटनेने स्वत: पुढाकार घेवून ही गाणी तयार करुन, ती सीडीद्वारे नागरिकांना उपलब्ध करुन देण्याचा संकल्प सोडला आहे.

या प्रकाशन कार्यक्रमामध्ये बोलताना मा. महापालिका आयुक्त यांनी कामगार कलाकारांच्या कलेची प्रशंसा केली. कामगार कलाकारांतील आत्मविश्वास जागवायला हवा, मनामध्ये असणारी कमीपणाची भावना पुसायला हवी, त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देणे आवश्यक असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. सफाई कामगारांना दिलेली सफाई सैनिक ही उपाधी अतिशय योग्य व समर्पक आहे व त्याप्रमाणेच सफाई कामगारांना सैनिकांप्रमाणे सन्मान व अधिकार मिळाला पाहिजे, असे ते म्हणाले. सार्वजनिक स्वच्छतेबाबत प्रशासनाबरोबरच कामगार संघटना करीत असलेल्या प्रयत्नांबाबत मा. महापालिका आयुक्त यांनी कामगार संघटनेचे कौतुक केले.

कर्कश आवाजापेक्षा किंवा हुबेहूब नक्कल करणाऱ्या आवाजापेक्षा चळवळीतील आत्म्याचा, जगात बदल घडविणारा आवाज या सीडीमध्ये कला पथकातील कलाकारांनी उतरविला आहे. कलेचे विकेंद्रीकरण होणे गरजेचे आहे. केवळ ठराविक वर्गाचीच मक्तेदारी कलेवर राहता कामा नये. जातीपातीची उतरंड मोडलीच पाहिजे असे जेष्ठ माहितीपट दिग्दर्शक अतुल पेठे म्हणाले. तसेच, युनियनचे अध्यक्ष डी. एस.देशपांडे, कार्याध्यक्ष श्री.प्रकाश जाधव व जॉ.सेक्रेटरी प्रकाश चव्हाण, इत्यादी मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन युनियनच्या सरचिटणीस मुक्ता मनोहर यांनी केले.

## माहे जुलै, २००९ सेवापूर्ती समारंभ

दि.३१/७/०९ रोजी छत्रपती शिवाजी सभागृह येथे माहे जुलै, ०९ मध्ये सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. यामध्ये ४३ वयोपरत्वे व ३ ऐच्छिक अशा एकूण ४६ सेवानिवृत्त अधिकारी/सेवकांचा सत्कार करण्यात आला. समारंभासाठी मा. निलेश निकम, अध्यक्ष, स्थायी समिती, मा. उमाकांत दांगट, अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि), मा.नंदकिशोर जगताप, सल्लागार (कामगार), मा. जयंत पवार, व्यवस्थापक, मुद्रणालय, कामगार कल्याण अधिकारी, पीएमसी एम्प्लॉईज युनियनचे सरचिटणीस व इतर पदाधिकारी उपस्थित होते. या सेवानिवृत्तांमध्ये पुणे महापालिकेमध्ये कामगार कल्याण निधी, पालखी सोहळा, सेवापूर्ती समारंभ, गरजेनुरुप प्रशिक्षण, इत्यादी अभिनव उपक्रम सुरु केलेले सल्लागार (कामगार) मा.नंदकिशोर जगताप यांचा समावेश होता.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना मा. नंदकिशोर जगताप यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद केली. यामध्ये वर्ग १ ते ४ मधील सर्व अधिकारी/सेवकांनी महापालिकेची केलेली दीर्घ सेवा विचारात घेवून त्यांना एकाच व्यासपीठावर एकत्रित आणून, त्यांचा सन्मान करणे आणि या अधिकारी/सेवकांच्या अनुज्ञेय रकमा सत्वर आदा करणेकामी चालना मिळणे ही भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले. त्याचप्रमाणे सर्व सेवानिवृत्त सेवकांनी सातत्याने कार्यमग्न राहून आरोग्य संपन्न जीवन व्यतित करावे, असे मार्गदर्शन श्री. जगताप यांनी प्रास्ताविकाद्वारे उपस्थितांना केले.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे मा. उमाकांत दांगट, अतिरिक्त महापालिका आयुक्त (वि) यांनी आपल्या मार्गदर्शनामध्ये सल्लागार (कामगार) कार्यालयातर्फे सुरु करण्यात आलेल्या या अभिनव उपक्रमाचे कौतुक केले. तसेच, महापालिकेमध्ये कामगार विभागामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून, त्याचा लाभ चतुर्थ श्रेणीसह सर्व कर्मचारी घेत असतात. याचे संपूर्ण श्रेय श्री. नंदकिशोर जगताप यांना असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. महानगरपालिकेमध्ये



सेवकांसाठी शासकीय कर्मचाऱ्यांपेक्षा उत्तम दर्जाच्या कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत, त्यामध्ये वैद्यकीय सहाय्य योजना, वारस अनुदान, वारस अर्थसहाय्य, इत्यादी योजना उल्लेखनीय असल्याचे मा. दांगट यांनी मार्गदर्शनामध्ये सांगितले. तसेच, या समारंभामध्ये अनेक सेवकांच्या अनुज्ञेय रकमा आदा करण्यात आल्या आहेत आणि अनेक सेवकांचे सेवानिवृत्ती वेतन अंतिम करण्यात येवून त्यांना पुढील महिन्यापासून सेवानिवृत्ती वेतन मिळणार आहे, हे या कार्यक्रमाचे प्रमुख यश असल्याचे मा. दांगट यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. निलेश निकम, अध्यक्ष, स्थायी समिती यांनी या स्तुत्य कार्यक्रमाबाबत कामगार विभागाचे प्रमुख मा. नंदकिशोर जगताप आणि त्यांचे सर्व सहकाऱ्यांचे अभिनंदन केले. तसेच, गेल्या २० वर्षांपासून राजकारणात सक्रीय असून, या मोठ्या कारकिर्दीमध्ये मी अशा प्रकारच्या कार्यक्रमास पहिल्यांदाच उपस्थित रहात असून, समोरील सेवानिवृत्त सेवकांशी चांगल्या प्रकारचा परिचय असल्याचे त्यांनी सांगितले. सेवकांच्या देय रकमा सेवानिवृत्तीच्या वेळी देणे ही निश्चितच अभिमानाची आणि गतिमान प्रशासनाची उदाहरणे आहेत. कारण सेवानिवृत्ती वेतन आणि अनुज्ञेय रकमांसाठी वर्षानुवर्षे हेलपाटे घालणाऱ्या सेवकांच्या भावना मी अतिशय जवळून अनुभवल्या आहेत. या कार्यक्रमाद्वारे सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांच्या देय रकमा आणि सेवानिवृत्ती वेतन सेवानिवृत्त दिनांकास मिळणे हा एक भाग्याचा क्षण असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय महानगरपालिकेने सुरु केलेल्या लोकसहभागातून विकास या संकल्पनेनुसार सेवानिवृत्त होणाऱ्या सेवकांनी त्यांच्या अनुभवाचा फायदा महापालिकेस करुन देवून विकास कामात सहभागी व्हावे, अशी आशा मा. निकम यांनी आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केली.

कार्यक्रमामध्ये सर्व सेवानिवृत्त सेवकांना स्मृतिचिन्ह, शॉल व गुलाबपुष्प देवून गौरविण्यात आले. कार्यक्रमामध्ये सर्व प्रमुख पाहुणे आणि अध्यक्षांनी उपस्थित सर्व सेवानिवृत्त सेवकांना सेवानिवृत्तीनंतरच्या कालावधीसाठी शुभेच्छा व्यक्त करुन कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामगार कल्याणाधिकारी श्री. अरुण खिलारी यांनी व आभार प्रदर्शन श्री. जयवंत शिंदे यांनी केले.

## राज्य माहिती आयोग यांच्या सूचना

मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ यांनी दिनांक ५/८/२००९ रोजीच्या पत्रान्वये माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या परिणामकारक अंमलबजावणीसाठी काही महत्वपूर्ण सूचना केल्या आहेत. यामध्ये प्रथम अपिलांची सुनावणी विहित मुदतीत घेणे, सहज देता येण्यासारखी माहिती विहित मुदतीपूर्वी देणे, शुल्काचा नेमका तपशिल नोंदविणे, पूर्ण व अचूक माहिती उपलब्ध करुन देणे, अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या आदेशात कारणमिमांसा नमूद करणे, अभिलेखांचे अवलोकन करुन देणेसाठी निश्चित कार्यपध्दती अवलंबणे, इत्यादींचा समावेश आहे. याशिवाय अधिनियमातील कलम ४ ची अंमलबजावणी परिपूर्णरित्या व तत्परतेने करणेकामी महापालिकेच्या विभागातील संबंधित खातेप्रमुख व जन माहिती अधिकारी यांनी १ (सी) व १ (डी) नुसार घेतलेले निर्णय, योजना, धोरणे, निविदा प्रक्रिया, इत्यादी माहिती जाहीर करणे आवश्यक आहे. सदर सूचना सर्व विभागांना पाठविण्यात आल्या असून, त्याची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे अनिवार्य आहे.

संपादकीय...

## महापालिका व प्रशासकीय सुधारणा

कोणत्याही संस्थेमध्ये दैनंदिन कामकाजाच्या पध्दतीमध्ये होणारे बदल विचारात घेवून त्यानुसार प्रशासकीय सुधारणा करणे ही काळाची गरज आहे. यासाठी केंद्र शासनाच्या पातळीवर स्वतंत्र प्रशासकीय सुधारणा विभाग कार्यरत असून, त्या विभागामार्फत प्रशासकीय बदलाच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करण्यात येत आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक विभागाने दप्तर व्यवस्थापन अधिक परिणामकारकरित्या करणे आवश्यक आहे. पुणे महानगरपालिकेमध्ये अ ब क ड ही दप्तर व्यवस्थापनाची पध्दत सर्वमान्य असून, त्याप्रमाणे प्रत्येक विभागातील कर्मचाऱ्यांनी दप्तर व्यवस्थापन ठेवणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे सहागठ्ठे पध्दतीचे कार्यालय परिपत्रक प्रसृत करण्यात आले असून, त्याप्रमाणे कार्यवाही करणे गरजेचे आहे. यामध्ये आलेले सर्व टपाल/पत्रे बारनिशीला नोंदविणे, त्याची वर्कशिटला नोंद घेणे, ज्या प्रकरणाचा निपटारा अल्पावधीत होणार आहे ती वर्कशिटमध्ये नोंदविणे, जी प्रकरणे ३० दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी कार्यान्वित रहाणार आहेत ती प्रकरणे अवेट रजिस्टरला नोंदविणे, महिन्याच्या शेवटी प्रकरणांचा गोषवारा वरिष्ठांना सादर करणे, इत्यादी बाबींच्या अनुषंगाने कार्यवाही करणे गरजेचे आहे. यामुळे माहिती अधिकारामधील कलम ४ मध्ये आदेशित केल्याप्रमाणे प्रत्येक कर्मचाऱ्याने सर्व कागदपत्रांची निर्देशसूची तयार करणे कायदेशीररित्या बंधनकारक आहे, ही बाब विचारात घेवून या परिपत्रकाप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्याने येणारी प्रकरणे किती दिवसांत निकाली काढावीत या विषयी स्पष्ट सूचना देणारा अधिनियम शासनाने निर्गमित केला आहे. त्यास विलंबास प्रतिबंध अधिनियम असे संबोधण्यात येते. यामध्ये प्रत्येक अधिकारी/कर्मचाऱ्याने आपल्याकडे येणारी प्रकरणे किमान एक आठवड्याच्या आत निकाली काढणे बंधनकारक करण्यात आले आहे. विहित मुदतीत कार्यवाही न करणारे अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याची तरतुदही या अधिनियमात करण्यात आली आहे. या अनुषंगाने महापालिकेमध्ये कार्यवाही सुरु करण्याचे प्रस्तावित करण्यात आलेले आहे. यामुळे शहरातील नागरिकांना त्यांची कामे वेळेत आणि तत्परतेने होणेकामी निश्चितच मदत होणार आहे.

माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ४ मध्ये नमूद १ ते १७ बाबींच्या अनुषंगाने सर्व आस्थापनांनी आपली माहिती जाहीर करणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच, या माहितीमध्ये प्रत्येक कार्यालयामधील निर्णय घेण्याची कार्यपध्दती आणि अधिकारी/कर्मचारी यांचेवर सोपविण्यात आलेली जबाबदारी आणि त्याचे निकष, इत्यादी बाबीच्या अनुषंगाने माहिती जाहीर करुन ती वेळोवेळी अद्ययावत करणे आवश्यक आहे. तथापि, या तरतुदीची परिपूर्ण अंमलबजावणी झाल्याचे दिसून येत नाही. मा. आयुक्त, राज्य माहिती आयोग यांनी लेखी पत्राद्वारे कलम ४ च्या अनुषंगाने परिणामकारक कार्यवाही करणेकामी सूचित केले आहे. सबब, महापालिकेतील सर्व अधिकारी/कर्मचारी यांनी या बाबीची गंभीरतेने दखल घेवून पूर्तता करणे बंधनकारक आहे.

पुणे महानगरपालिका ही नागरिकांना सेवा पुरविणारी संस्था असून, महापालिकेचा कारभार मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम, १९४९ च्या तरतुदीनुसार चालतो. यामध्ये शहरातील नागरिकांना मुलभूत सोयीसुविधा उपलब्ध करुन देणे हे सर्वोच्च प्राधान्य आहे. नागरिकांचे कोणते काम किती वेळेमध्ये पूर्ण करणे अपेक्षित आहे, यासाठी आवश्यक असणारे निकष आणि होणारी पूर्तता या बाबींच्या अनुषंगाने नागरिकांची सनद यापूर्वी महापालिकेमध्ये जाहीर करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने सर्व विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पूर्तता करणे आवश्यक आहे.

त्याशिवाय पुणे महापालिकेच्या विविध विभागांमध्ये कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी त्यांच्या तक्रारी आणि त्यांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी विहित कालमर्यादा आणि निकष निश्चित करणे आवश्यक आहे. या दृष्टीने सेवकांच्या प्रश्नांची तड लावण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. त्यामुळे कर्मचाऱ्यांचे दैनंदिन प्रश्न वेळेवर सोडवून त्यांच्यातील आत्मविश्वास वाढीस लावणे शक्य होणार आहे. या अभिनव कल्पनेस कर्मचारी सनद असे संबोधण्यात येवून भविष्यकाळात या सनदेप्रमाणे कर्मचाऱ्यांचे विविध प्रश्न विहित मुदतीत सोडविणे अपरिहार्य होणार आहे.

पुणे महापालिकेच्या विविध विभागातून भिन्न कामकाज सुरु असते. त्यामुळे त्या विभागातील दैनंदिन कामकाजाबरोबरच लोकशाही दिनामधील तक्रारी, माहिती अधिकार अधिनियम, तारांकित/अतारांकित प्रश्न, लोक आयुक्त/उप लोक आयुक्त यांची प्रकरणे, नागरिक आणि लोकप्रतिनिधी यांची पत्रे, मा. महापालिका आयुक्त आणि मा. अतिरिक्त महापालिका आयुक्त यांचे आदेश, विविध समित्यांकडून मागविण्यात येणारे अभिप्राय, न्यायालयीन प्रकरणे, इत्यादी बाबतची मासिक माहिती संकलित करुन त्यादृष्टीने आढावा घेण्यासाठी आढावा आणि संनियंत्रण (Review & Monitoring System) सुरु करण्याची अभिनव कल्पना सध्या अस्तित्वात येत आहे. या योजनेंतर्गत विविध विभागांमध्ये तपासणी करुन त्यांच्या मासिक आढाव्यावरुन त्या विभागांच्या कामकाजाबाबतची गतिमानता, कार्यक्षमता याची मोजदाद करणे शक्य होणार आहे. वरील प्रशासकीय सुधारणा पुणे महानगरपालिकेमध्ये राबविण्याचा मानस असून, यामुळे प्रशासन निश्चित कार्यक्षम आणि गतिमान होण्यास मदत होणार आहे.

## श्री. ज्ञानेश्वर मोळक, उप आयुक्त

वैशिष्ट्यपूर्ण योजना राबविणाऱ्या अधिकारी/सेवकांच्या परिचय मालिकेतील अधिकारी म्हणून या अंकात श्री. ज्ञानेश्वर मोळक यांची ओळख करुन घेणार आहोत.

विजेते वेगळ्या गोष्टी करत नाहीत, तर ते प्रत्येक गोष्ट वेगळ्या प्रकारे करतात. याप्रमाणे श्री. ज्ञानेश्वर मोळक हे अतिशय प्रतिकुल परिस्थितीतून मार्गक्रमण करुन आचारविचार, सभोवतालचा संस्कार व वाचनातून पुढे आलेले व्यक्तिमत्व. मन, मान, मस्तक, मणका व मनगट सतत शाबूत व जागृत ठेवल्यानेच पाठीशी कसलेच पाठबळ नसतानाही यशस्वीतेच्या शिखरावर जाताना ते दिसत आहेत. कौटुंबिक व सामाजिक जीवनात इतरांच्या सतत उपयोगी पडण्यात त्यांना आनंद होतो. राग, लोभ, मोह, मद, मत्सर अशा विकारांपासून दूर असलेले अनेकांना प्रेरणादायी व आदर्शवत असे हे व्यक्तिमत्व आहे.

भूमीहिन शेतमजुराच्या घरात अतिशय दारिद्र्यात यांचा जन्म झाला. आई दुसऱ्यांच्या शेतात मोलमजुरी व वडिल सरकार कृषी खात्यातील शेतमजुर होते. आळंदीत जन्मलेले श्री.मोळक यांना कार्तिकी यात्रेत हमाली करणे, केळी, शेंगा, शेंगदाणे डोक्यावर पाटी घेवून विकणे, शाळा सांभाळून शेण गोळा करायला जाणे, लहान तीन भावंडांना सांभाळणे अशी अनेक कष्टाची व जबाबदारीची कामे लहानपणापासून करावी लागली.

त्यांचे इयत्ता चौथीपर्यंतचे शिक्षण चोविसावाडी (चऱ्होली)येथे व पाचवी ते दहावी आळंदी येथे श्री. ज्ञानेश्वर विद्यालयात झाले. कुस्त्रो वाडियातून स्थापत्य शास्त्रातील पदविका (डिप्लोमा सिव्हिल) पूर्ण केल्यानंतर स्पर्धा परीक्षांना बसता यावे म्हणून बारावी पास होवून नोकरी करीत बी.ए.(राज्यशास्त्र) पूर्ण केले. घरचे वातावरण पोषक, मार्गदर्शक नसतानाही मित्र, शिक्षक व समाज यांच्या मार्गदर्शनाने ते घडत गेले. महात्मा गांधी, जयप्रकाश नारायण, सुभाषचंद्र बोस, शिवाजी महाराज असे अनेक आदर्श बालपणापासून त्यांच्या समोर होते. इयत्ता आठवी पासून मार्क्सवाद, लेनिनवाद, समाजवादी विचारसरणीचा त्यांचा अभ्यास सुरु झाला आणि ते नास्तिकवादाकडे झुकु लागले.

दहावीनंतर गावातील शालेय विद्यार्थ्यांसाठी सन १९८० ते १९८५ पर्यंत युवक क्लासेस मोफत चालविले. सन १९८० मध्ये संपर्काधिष्ठित अभ्यासक्रमांतर्गत ग्रामोध्दार हाच देशोध्दार हे लक्षात घेवून तत्कालीन शिक्षण संचालक वि.वि.चिपळूणकरांच्या मार्गदर्शनाखाली चऱ्होली गावात अनेकविध उपक्रम राबविले. आळंदी-चऱ्होली-पुणे दररोज एस.टी.प्रवासात अनेक अडचणी होत्या. त्यांचे निवारण होवून प्रवास सुखकर होण्यासाठी श्री. कृष्णा चोपदार गुरुजी (सासरे) यांच्या मार्गदर्शनाखाली दैनंदिन प्रवाशांची आळंदी प्रवासी संघटना दिनांक ४/१०/१९८४ रोजी स्थापन केली. श्री. बिंदु माधव जोशी यांच्या अधिपत्याखाली एस.टी.सुधार लोकसमिती सचिवपदीही काम पाहिले. सन १९८४ ते १९८९ मध्ये आळंदी-



पुणे शटल सेवासुरु करण्यात यश मिळाले व इथूनच सन १९८९ मध्ये शैलजा (पत्नी) व ज्ञानेश्वर मोळक यांचा सहप्रवास पती पत्नी म्हणून सुरु झाला.

सन १९८५ मध्ये श्री. मोळक पुणे महानगरपालिका सेवेत कनिष्ठ अभियंता पदी रुजू झाले. कै. अप्पासाहेब भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली अभियंता संघाचे उपाध्यक्ष म्हणून काम पाहिले. कर्तव्याबरोबर समाजऋण मानून सन १९९२ पासून दोघेही पतीपत्नी मराठा सेवा संघाचे कार्यकर्ते झाले. सन १९९६ मध्ये आळंदी शहर शाखा सुरु केली.

सन २००१ मध्ये विजयादशमीच्या मुहूर्तावर श्री. मोळक सहाय्यक आयुक्तपदी नियुक्त झाले. जबाबदारीचे पद सांभाळताना कामाचे व वेळेचे उत्कृष्ट व योग्य नियोजन, हाताखालील लोकांना प्रशिक्षित करणे, महत्वाचे व योग्य निर्णय कमीत कमी वेळेत व अचूक घेणे त्यांच्या अंगवळणी पडले. सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयात क्षेत्रीय अधिकारी पदावर काम करताना कात्रज, धनकवडी, आंबेगाव व आंबेगाव पठार या नव्याने समाविष्ट गावांना लोकप्रतिनिधी नसतानाही स्थानिक कार्यकर्ते व नागरिक यांच्याशी सलोख्याचे संबंध निर्माण करुन पाणीपुरवठा, आरोग्य व स्वच्छतेबाबत सुविधा पुरविण्याचे प्रयत्न केले.

श्री. मोळक यांच्या क्षेत्रीय आयुक्त या कल्पनेतून आज चार विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. यासाठी त्यांनी तत्कालीन महापालिका आयुक्त श्री. टी.सी.बेंजामिन यांचेकडे प्रस्ताव सादर केला होता. आजपर्यंत क्षेत्रीय कार्यालयाकडील नवनवीन कल्पनांचा पाठपुरावा श्री. मोळक यांनी मा. श्री. सुरेश जगताप व अन्य सहकाऱ्यांसह सतत केला आहे. क्षेत्रीय कार्यालय स्तरावर विकेंद्रीकरणाचे ९०% काम पूर्ण करण्यात त्यांचा महत्वाचा वाटा आहे. सर्व प्रभाग समित्या व क्षेत्रीय कार्यालये आपापल्या स्तरावर कार्यक्षम झाल्यास अनेक प्रश्न स्थानिक पातळीवरच सुटतील असा विश्वास त्यांना आहे. कार्यालय स्वतंत्रपणे अद्ययावत करण्यापासून ते अधिकार मिळण्यासाठी वेगवेगळ्या स्तरावर त्यांनी प्रयत्न केले आहेत.

सार्वजनिक स्वच्छता, निवडणूक, जनगणना, राष्ट्रकुल स्पर्धा यामध्ये त्यांचा सहभाग आहे. तसेच शिवजयंती महोत्सव उत्साहात साजरा करण्यात त्यांचा महत्वाचा वाटा असतो.

पुणे मनपामध्ये काम करताना अतिक्रमण, अनधिकृत बांधकाम, अनधिकृत नळजोडणी, नवीन झोपड्या निर्माण होणे, नवीन देवळे, मशीद, चर्च, इत्यादी धार्मिक बाबी निर्माण होणे याबाबतचे कामकाज ते जीव धोक्यात घालून करतात.

श्री. मोळक यांना साहित्यिक ओढाही अधिक आहे. त्यांचे भेट व चंद्रकोर हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. अथक परिश्रम, संवाद व समन्वय, समोरच्याचे म्हणणे पूर्णपणे ऐकून घेण्याची मानसिकता हेच माझ्या यशाचे गमक आहे असे ते मानतात.

सध्या ते पुणे महानगरपालिका अभियंता संघाचे सल्लागार, जिजाउ ग्रंथालय, शिवस्फूर्ती प्रतिष्ठान, शिवस्पर्शी अंकाचे मार्गदर्शक, कुस्त्रो वाडिया (स्थापत्य) कोर्स कमिटीचे सदस्य म्हणून कार्यरत आहेत. सन २००५-०६ चा कामगार कल्याण निधीतर्फे गुणवंत कामगार पुरस्कार, पुणे जिल्हा मराठी पत्रकार संघाचा कार्यक्षम अधिकारी पुरस्कार, संभाजी ब्रिगेडचा उत्कृष्ट कार्यकर्ता पुरस्कार, भैरवनाथ नागरी सहकारी पतसंस्था लांडेवाडी (मंचर) येथील उत्कृष्ट सामाजिक कार्यकर्ता पुरस्कार, असे अनेक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत.

छत्रपती संभाजीराजांनी लिहिलेला बुधभूषण हा संस्कृत ग्रंथ डॉ. ताकवले यांचेकडून मराठी अनुवाद करुन प्रकाशित करण्याचे काम श्री. मोळक यांनी केले आहे. जगदगुरु श्रीसंत तुकाराम महाराज स्मारक ग्रंथ फेब्रुवारी, २००९ मध्ये जिजाउ ग्रंथालयातर्फे प्रकाशित केला आहे.

लग्नापूर्वी आईची व लग्नानंतर पत्नीची उत्तम साथ लाभली आहे. स्वकर्तुत्वावर विश्वास ठेवून आज इथपर्यंत आल्याचे आत्मिक समाधानच पुढे अधिकाधिक कार्यरत रहाण्यासाठी मनोबल वाढवते, अशी श्री. मोळक यांची मनोकामना आहे. त्यांच्या पुढील वाटचालीसाठी व उज्वल भवितव्यासाठी पुणे महानगरपालिका कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## उद्यान विशेषांकाचे मा.महापालिका आयुक्त यांचे हस्ते प्रकाशन

पुणे महानगरपालिका व डॉ.नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्ट पुणे यांचे संयुक्त प्रयत्नातून तयार झालेल्या उत्तिष्ठत जाग्रतच्या ९ व्या वर्षाचा वर्षारंभ अंक उद्यान विशेषांकाचे मा. महेश झगडे,



महापालिका आयुक्त यांचे हस्ते प्रकाशन करण्यात आले.

सदर प्रसंगी मा. महापालिका आयुक्त यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. निसर्गाने मानव जातीला मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक संपत्तीचा ठेवा दिलेला आहे. मात्र त्या मानाने निसर्गाला आपण काही देत नाही. तसेच, निसर्ग समतोलाकरिता आपणाकडून होणारे प्रयत्नही तोकडे आहेत. त्यामुळे पर्यावरणाचा ऱ्हास मोठ्या प्रमाणावर झालेला दिसून येत आहे. पर्यावरण संतुलनाकरिता ज्या बाबी करणे आवश्यक आहे त्या बाबींपैकी एक म्हणजे उद्यानांची निर्मिती मोठ्या प्रमाणावर करणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन मा. आयुक्त यांनी केले.

पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास भरुन काढणे अवघड आहे. मात्र पर्यावरणाच्या संतुलनाकरिता तसेच प्रदूषण निर्मूलनाकरिता विविध पर्यायांचा मोठ्या प्रमाणावर विकास व अंमलबजावणी करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

शहर विकास आराखड्यातील विकास कामे राबविताना अधिकाधिक हिरवा पट्टा कसा वाढविता येईल, याचाही नक्कीच विचार केला जाईल. पुण्याची संस्कृती चांगली व दिशादर्शक आहे. पर्यावरण संतुलनाच्या दृष्टीने कार्यरत असणारी संस्कृतीही दिशादर्शक आहे. त्यानुसार पुण्यातील सर्व उद्यानांची माहिती एकत्रित करुन हा विशेषांक तयार केला ही अतिशय कौतुकाची बाब आहे. एखाद्या विषयाची माहिती गोळा करुन प्रभावीपणे एकत्रित सादर करणे अवघड व कष्टदायक काम असते. परंतु या उद्यान विशेषांकाच्या निमित्ताने पुणे मनपा व डॉ. नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्टच्या माध्यमातून हे शक्य झाले आहे. याबाबत त्यांनी समाधान व्यक्त केले.

या प्रसंगी मा. भानुदास माने, उप आयुक्त यांनी या उद्यान विशेष अंक निर्मितीबाबत माहिती सांगितली. तसेच, वनस्पती तज्ञ डॉ. हेमलता दत्तात्रय साने, मा. अॅड दादासाहेब बेंद्रे यांची समयोचित भाषणे झाली. डॉ.हेमलता साने यांचे हस्ते माजी उद्यान अधिक्षक श्री. यशवंत खैरे यांचा शॉल, स्मृतीचिन्ह व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास मा. सौ. सुलोचना तुपे, वृक्ष प्राधिकरण समिती सदस्य, डॉ. सुनिता मोरे, मा. चंद्रसेन बोऱ्हाडे, मा. हाजी जाकिर मोईनुद्दिन शेख, तसेच अन्य पदाधिकारी, सदस्य, मंदार डोळे, गौतम गेलाड, रामदास वाघचौरे, डॉ. नानासाहेब परुळेकर सकाळ चॅरिटी ट्रस्टचे पदाधिकारी, कार्यकर्ते, तसेच मनपा अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्रीमती विजया अरविंद जोशी यांनी केले.

## स्वाईन फ्ल्यू जनजागृती व मोफत आरोग्य शिबीराचे आयोजन

वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालय व इंदिरा कॉलेज ऑफ फार्मसी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वाईन फ्ल्यूबाबत पथनाट्याद्वारे जनजागृती करण्यात



आली. श्री. छत्रपती संभाजी विद्यालय, कोथरुड, श्री. सरस्वती विद्या मंदीर, डहाणुकर कॉलनी, अशोक सम्राट विद्यालय या शाळेमधील विद्यार्थी पालक व शिक्षकांचे प्रबोधन करण्यात आले. या प्रसंगी डॉ. आर.आर.परदेशी, आरोग्य प्रमुख, मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर व वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाकडील अधिकारी/सेवक उपस्थित होते.

त्याचप्रमाणे मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर यांच्या पुढाकाराने आणि वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या सहकार्याने पुणे मनपा विद्यानिकेतन शाळा क्र. ८ येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या आरोग्य शिबीरात २७५ विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली. या वेळी वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकारी/कर्मचारी उपस्थित होते. स्वाईन फ्ल्यूच्या परिस्थितीत घ्यावयाची दक्षता आणि जागृती हाच खरा उपाय असल्याचा संदेश यामधून देण्यात आला.

याशिवाय मा. शाम देशपांडे व वारजे कर्वेनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या वतीने श्री. सरस्वती विद्या मंदीर, डहाणुकर कॉलनी, कोथरुड येथील शालेय विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य शिबीर आयोजित करण्यात आले होते. या आरोग्य शिबीरात २२० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

वरील दोन्ही आरोग्य शिबीरे आणि स्वाईन फ्ल्यूबाबत जनजागरण मोहिम यशस्वीपणे राबविणेसाठी वारजे क्षेत्रीय कार्यालयाकडील डॉ. संतोष मुळे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी, श्री. मधुकर कारकुड, विभागीय आरोग्य निरीक्षक, श्री. दिपक ढेलवान, आरोग्य निरीक्षक व इतर सेवकांनी क्षेत्रीय अधिकारी मा. सुनिल गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष परिश्रम घेतले.

## मोफत बस पास वितरण कार्यक्रम संपन्न

पुणे महानगरपालिकेच्या हद्दीत रहाणाऱ्या इयत्ता पाचवी ते दहावीमधील विद्यार्थ्यांसाठी पुणे महानगर परिवहन महामंडळामार्फत मोफत बस पास योजना राबविण्यात येत आहे. शालेय विद्यार्थ्यांना सार्वजनिक वाहतूक



व्यवस्था प्रवासाची सवय लावणे, विद्यार्थ्यांना सुरक्षित प्रवासाची सेवा उपलब्ध करुन देणे, आर्थिकदृष्ट्या गरीब विद्यार्थ्यांच्या पालकांवरील विद्यार्थ्यांच्या शालेय प्रवासावरील खर्च कमी करणे, प्रदूषण कमी करणे व पर्यावरण संतुलनाच्या प्रयत्नास हातभार लावणे हा या योजनेमागील उद्देश आहे. सदर योजनेकरिता पुणे महानगरपालिका अंदाजपत्रकात सन २००९-१० मध्ये रु. ९ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना घर ते शाळा व शाळा ते घर या प्रवासाकरिता आवश्यक मार्गांसाठी मार्गावरील नियमित बसेसद्वारे सेवा उपलब्ध करण्यात येणार आहे. शहरातील त्या त्या भागातील महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयामार्फत कार्यालयीन वेळेत विद्यार्थ्यांना मोफत बस पासचे वितरण करण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे.

सदर योजनेंतर्गत दिनांक ७/८/२००९ रोजी श्री. छत्रपती शिवाजी महाराज सभागृह येथे मा. संजय राउत, खासदार यांचे शुभ हस्ते प्रातिनिधीक स्वरुपात २४ विद्यार्थ्यांना मोफत बस पास वितरित करण्यात आले. या प्रसंगी मा संजय राउत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, पुणे महापालिकेने सुरु केलेला हा उपक्रम अतिशय कौतुकास्पद असून, या योजनेबाबत पालिकेतील मा. सभासद, मा. पदाधिकारी यांनी राजकीय मतभेद न आणता एकत्रितरित्या घेतलेला निर्णय अतिशय चांगला आहे. विद्यार्थी व त्यांच्या शिक्षणाकरिता, त्यांच्या सुरक्षिततेकरिता मनपाने केलेला खर्च ही चांगली बाब आहे. अशा प्रकारची योजना राबविणारी पुणे महापालिका ही एकमेव महापालिका असून, पुढील काळात या योजनेचा लाभ शहरात बाहेरुन येणारे विद्यार्थी तसेच ज्येष्ठ नागरिक यांना देणेबाबत विचार करण्यात यावा.

या प्रसंगी स्वागतपर भाषण करताना मा. सौ.राजलक्ष्मी भोसले, महापौर, पुणे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांचे शिक्षणाकरिता पालकांना विविध अडचणींना सामोरे जावे लागते. अशा परिस्थितीत विद्यार्थ्यांना मोफत व सुरक्षित प्रवास होण्याच्या दृष्टीने मनपाने सहाय्य करावे, या हेतूने व सर्वपक्षीय मा. पदाधिकारी यांचे एकत्रित चर्चा व निर्णयाने हा उपक्रम यशस्वी झाल्याचे त्यांनी सांगितले.

मा. शाम देशपांडे, सभासद यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने व सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने सदरचा निर्णय सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांनी एकत्रित घेतला. पुढील काळात उत्पन्नात विविध मार्गांनी वाढ झाल्यास सदरचा उपक्रम व्यापक स्वरुपात राबविता येईल, असे त्यांनी सांगितले. मा. निलेश निकम, अध्यक्ष, स्थायी समिती यांनी आपल्या भाषणात मा.शाम देशपांडे यांनी ही स्तुत्य कल्पना मांडली व सर्वांनी त्यास पाठिंबा दिला. तसेच वेळोवेळी स्थायी समितीत चर्चा करणेत आली. उपक्रमाचे नियोजन, खर्च, अंमलबजावणी, येणाऱ्या समस्या, तरतुदी, उत्पन्न या सर्वांचा विचार करुन सांघिक निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

सदर कार्यक्रमास मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर, मा. आबा बागुल, मा. नाना वाडेकर, मा. महादेव बाबर, मा. अशोक येनपुरे, मा. राजा बलकवडे, मा. पृथ्वीराज सुतार, मा. विजय देशमुख, मा. दिपक गावडे, मा. सौ. मंगला मंत्री, मा. नितीन खाडे, मा. सुधाकर तांबे, मा. रामचंद्र जाधव, मा. भानगिरे, मा. अशोक हरणावळ, मा. प्रशांत बधे, अन्य सभासद, पदाधिकारी, कार्यकर्ते, मनपा अधिकारी/कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मा. सागर माळकर यांनी तर आभार प्रदर्शन मा. चंद्रकांत मोकाटे, उपमहापौर यांनी केले.

# प्रशिक्षण - एक गरज

कोणत्याही संस्थेच्या स्थापनेमागील प्रयोजन पूर्वनियोजित असते. या पूर्वनियोजनानुसार प्रत्येक संस्थेचे विशिष्ट ध्येय असते. संस्था विविध क्षेत्रात विविध उद्दिष्टाने काम करीत असतात. त्यांची विभागणी प्रामुख्याने उत्पादन व सेवाक्षेत्र अशी करण्यात येते. पुणे महानगरपालिका ही पुणे शहरातील नागरिकांना नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी स्थापन झालेली आहे. उत्पादन आणि सेवा क्षेत्रामध्ये काम करताना संस्थेने ठरविलेल्या उद्दिष्टांची मान्य धोरणानुसार अंमलबजावणी करणे आवश्यक असते आणि अंमलबजावणी करण्यासाठी मनुष्यबळ, अर्थ, यंत्रसामग्री आणि साहित्य यांची पर्याप्त उपलब्धता अनिवार्य असते. त्यामध्ये मनुष्यबळ हे महत्वाचे आहे. ते कार्यक्षम असणे अनिवार्य आहे. कारण अन्य तीन घटक या मनुष्यबळाच्या कार्यक्षमतेनुसार वापरले जाणार असतात. त्याचबरोबर मनुष्यबळ ज्या पध्दतीने अन्य तीन घटकांचा वापर करणार आहे ती पध्दत जर शास्त्रीय, अचूक व संबंधित मनुष्यबळाशी सुसंगत असेल तर उत्पादन व सेवा दर्जेदार दिल्या जातील, हे नैसर्गिक सत्य आहे.

महानगरपालिका ही सार्वजनिक आरोग्य, पाणी पुरवठा, मलनि:सारण, पथ आणि पथावरील दिवाबत्ती, आरोग्य सुविधा या सारख्या नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असणाऱ्या नागरी सेवा देणारी आणि सेवा क्षेत्रात येणारी संस्था आहे. सेवा क्षेत्रामध्ये साहित्यापेक्षा कुशल मनुष्यबळाची प्रामुख्याने नितांत आवश्यकता असते. कारण मनुष्यबळ हे निसर्गनिर्मित असते. या निसर्गनिर्मित मनुष्यबळावर प्रशिक्षणाद्वारे उत्तम कार्यसंस्कार करुन, कार्यकुशल मनुष्यबळ निर्माण करणे ही एक अत्यंत अवघड तथापि अनिवार्य बाब आहे. प्रत्येक व्यक्तीला ज्ञान घ्यावेच लागते. ज्ञान हे ४ प्रकारचे असते. नैसर्गिक, संस्काराचे, शालेय आणि अनुभवाचे ज्ञान. यामध्ये दुसऱ्या आणि तिसऱ्या पध्दतीचे ज्ञान देण्यासाठी त्यांच्यावर संस्कार करुन त्यांना शास्त्रीय ज्ञान देणेसाठी करण्यात येणारी प्रक्रिया म्हणजे प्रशिक्षण होय. या प्रशिक्षणामध्ये संबंधित प्रशिक्षणार्थीला सहभागी करुन घेवून, त्याच्या अनुभवाच्या ज्ञानाच्या आधारे त्याला शास्त्रीयदृष्ट्या ज्ञान देवून संस्कारित करणे ही एक अत्यंत कौशल्याची तथापि अनिवार्य अशी प्रशिक्षणाची बाजू विचारात घेणे आवश्यक आहे.

प्रत्येक संस्थेचे यशस्वी संचालन हे पुरेसा अर्थपुरवठा, अद्ययावत यंत्रसामग्री, कार्यक्षम कर्मचारी आणि कामाची शास्त्रीय पध्दती या चार घटकांवर अवलंबून असते. यापैकी संस्थेत कार्यक्षम कर्मचाऱ्यांमुळे कामकाज कमाल कार्यक्षमतेने केले जाते व संस्थेचे संचालन प्रभावीपणे होते. अद्ययावत यंत्रसामग्री व कच्चा माल उच्च प्रतीचा उपलब्ध असूनही कर्मचारी अकुशल असल्यास उत्पादन व सेवेचा दर्जा अपेक्षित स्तर गाठू शकत नाही.यासाठी कर्मचाऱ्यांमधील गुणवत्ता व कार्यक्षमतेचा कमाल वापर करुन मनोधैर्य वाढून त्यांना कार्यप्रवण करण्यासाठी प्रशिक्षण ही काळाची गरज आहे. व्यवस्थापन तज्ञांच्या मते अकुशल कर्मचाऱ्यांना कुशल बनविण्याची क्षमता प्रशिक्षणामध्येच आहे. प्रशिक्षणाचा संबंध ज्ञानवृध्दी व कौशल्यवाढ आणि त्यातून दर्जेदार निर्मितीशी आहे (Training is the act of increasing the knowledge & skill of an employee for doing a particular job) प्रशिक्षण हे सुनियोजित कार्यपध्दतीचा उपयोग करुन घेण्याची एक प्रक्रिया आहे. परंतु आधुनिक काळात बदलणारे तंत्रज्ञान, वाढती स्पर्धा, संगणकाचा विस्तार व उपयुक्तता, कालबाह्य कार्यपध्दती, व्यवस्थापनाच्या बदललेल्या संकल्पना (आयएसओ, सिक्स सिग्मा, कायझेन प्रणाली, इ.) यामुळे प्रशिक्षण ही निरंतरपणे चालणारी प्रक्रिया बनली आहे.

प्रशिक्षण आयोजित करण्यापूर्वी पूर्वतयारी म्हणून परिणामकारक प्रक्रिया राबविणे आवश्यक आहे. या प्रक्रियेमध्ये प्रशिक्षणाची गरज, योग्य प्रशिक्षणार्थींची निवड, तज्ञ व प्रशिक्षित प्रशिक्षकाची नियुक्ती या बाबींचा समावेश होतो. याशिवाय प्रशिक्षण कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर तज्ञ, त्रयस्त व प्रशिक्षणार्थीकडून मूल्यमापन करुन घेणे आवश्यक असते. जेणेकरुन प्रशिक्षणामुळे अपेक्षित परिणाम व प्रशिक्षणाचे उद्दिष्ट प्राप्त झाले अगर कसे हे तपासले जाते.कारण मूल्यमापनावर प्रशिक्षणाचे यशापयश अवलंबून असते.

गरजेनुरुप व सतत प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे ही काळाची मागणी आहे. प्रशिक्षण अनेक माध्यमांद्वारे (अनुभवी कर्मचारी, तज्ञ पर्यवेक्षक, बहिर्गत प्रशिक्षण केंद्रे, भाषण, परिषद, परिसंवाद, कार्यशाळा, समूह चर्चा, इ.) देणे शक्य आहे. एकंदरच कोणत्याही खाजगी वा शासकीय संस्थेच्या कर्मचारी गुणवत्तेचा पर्याप्त वापर करुन संस्थेची कार्यक्षमता व गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रशिक्षण प्रक्रिया अनिवार्य झाली आहे. याचाच एक भाग म्हणून पुणे महापालिका नव्याने स्थापन झालेल्या मनुष्यबळ विकास कक्षामार्फत गरजेनुरुप व सतत प्रशिक्षण कार्यक्रम राबवित असून, त्यामध्ये अनुक्रमे मुलत: बदलत्या काळानुरुप आणि अद्ययावत कौशल्य वाढीसाठी १) पदाधिष्ठित, २) विशेष आणि ३) उजळणी वर्ग या तीन प्रकारे प्रशिक्षण देणेचा प्रयत्न करीत आहे.

यासाठी पुणे महानगरपालिकेमध्ये स्वतंत्र प्रशिक्षण संस्था असणे गरजेचे आहे. त्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात येत आहेत. अशी प्रशिक्षण संस्था स्वतंत्रपणे कार्यान्वित केल्यानंतर या संस्थेमार्फत तज्ञ प्रशिक्षक नियुक्त करुन महानगरपालिकेचे कामकाज, अधिनियमातील तरतुदी, आधुनिक कार्यालयीन कामकाज, इत्यादींच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांना विशेष प्रशिक्षण देणे शक्य आहे. ज्यायोगे महापालिका अधिकारी/कर्मचाऱ्यांचे ज्ञान आणि कौशल्यामध्ये वाढ होवून त्याचा अप्रत्यक्ष फायदा संस्थेची कार्यक्षमता वाढीमध्ये परावर्तित होवू शकेल.

**कल्याणवार्ता**
**ऑगस्ट, २००९**
❖ **प्रकाशक तथा अध्यक्ष** ❖
**कामगार कल्याण निधी**
**मा. महेश झगडे**
आयुक्त, पुणे महापालिका
❖ **संपादक** ❖
मा. नंदकिशोर जगताप
सल्लागार (कामगार)
❖ **कार्यकारी संपादक** ❖
शिवाजी दौंडकर
कामगार कल्याण अधिकारी
❖ **सहाय्यक** ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ **मुद्रक** ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ **प्रकाशन स्थळ** ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर, पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ **संपर्क** ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
nandkumar.jagtap@punecorporation.org

# कामगार कल्याण निधी - आढावा

पुणे महापालिका अधिकारी/सेवकांसाठी ऑक्टोबर, २००५ पासून स्वतंत्र कामगार कल्याण निधी स्थापन करण्यात आला आहे. सदर निधी अस्तित्वात येण्यापूर्वी पुणे महापालिका कर्मचाऱ्यांसाठी कल्याणकारी योजना राबविणेकामी मर्यादा येत होत्या. ही बाब विचारात घेवून तत्कालीन सल्लागार (कामगार) मा. नंदकिशोर जगताप यांनी पुढाकार घेवून सततच्या ५-७ वर्षांच्या पाठपुराव्यामुळे शासन निर्णय क्र. पीएमसी ३०२००३/२४६२/सीआर-२११/०३/युडी २२ अन्वये महापालिकेच्या कामगार कल्याण निधीस शासनाने मान्यता दिली.

या कामगार कल्याण निधीमध्ये सुरुवातीस प्रति कामगार वर्गणी रु. ६०/- आणि तेवढाच प्रशासनाचा हिस्सा असा निधी निर्माण होत होता. तथापि, सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने सदर वर्गणी रु. १००/- करण्यात आली. कामगार कल्याण निधीच्या विहित उद्देशानुसार सेवेत असताना कर्मचारी मृत्यू झाल्यास रु. १५,०००/- वारस अनुदान, पाल्यांच्या उच्च शिक्षणासाठी शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती, सभासदांचे विशेष प्रशिक्षण, कार्यशाळा, संमेलने, सांस्कृतिक कार्यक्रम, क्रिडा स्पर्धांचे आयोजन, गुणवंत कामगार पुरस्कार, इत्यादी विविध कल्याणकारी योजनांवर आतापर्यंत खर्च करण्यात आलेला आहे.

सुरुवातीस गुणवंत कामगार पुरस्कार १० पर्यंत मर्यादित ठेवण्यात आले होते. तथापि, सभासदांची संख्या विचारात घेवून कार्यकारी समिती आणि सर्वसाधारण सभेच्या मान्यतेने पुरस्काराची संख्या २० पर्यंत वाढविण्यात आली. तसेच, सुरुवातीस शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्तीची र.रु.१२,०००/- ची मर्यादा वाढवून ती रु.२५,०००/- करण्यात आली.

या कामगार कल्याण निधीच्या अंमलबजावणीसाठी आणि विहित कर्तव्ये पार पाडण्यासाठी कार्यकारी समिति गठित करण्यात आली आहे. या समितीमध्ये सर्व संवर्गातील अधिकारी/कर्मचाऱ्यांना प्रतिनिधीत्व देण्यात आले असून, या समितीचा कार्यकाल ३ वर्षांपर्यंत ठेवण्यात आला आहे. यामध्ये ४ पदसिध्द पदाधिकारी असून, इतर संवर्गातील ८ सदस्य कार्यकारी समितीवर कार्यरत आहेत. यामध्ये मान्यताप्राप्त कामगार संघटनेच्या प्रतिनिधीचा समावेश आहे.

**सन २००५-०६ :** या वर्षामध्ये रु. १४.७७ लाख निधी संकलित झाला असून, त्यामधून ३२ लाभार्थीना रु. ४.८० लाखाचे वारस अनुदान देण्यात आले आहे. या वर्षामध्ये सभासद सेवक व त्यांच्या पाल्यांसाठी अनुक्रमे नाटक व विविध गुणदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

**सन २००६-०७ :** या आर्थिक वर्षामध्ये रु. २५.९३ लाख संकलित निधीतून १०६ लाभार्थींना १५.९० लाखाचे वारस अनुदान देण्यात आले. याशिवाय ५ सभासदांच्या पाल्यांना रु. ६०,०००/- ची शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती देण्यात आली. या वर्षामध्ये प्रथमत:च महापालिका अधिकारी/सेवकांसाठी क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

**सन २००७-०८ :** या आर्थिक वर्षामध्ये रु. ३२.८० लाख संकलित निधीतून ९६ लाभार्थींना १४.४० लाखाचे वारस अनुदान देण्यात आले. या वर्षामध्ये प्रथमत:च महापालिका अधिकारी/सेवकांच्या पाल्यांनी माध्यमिक व उच्च माध्यमिक परीक्षांमध्ये संपादन केलेले नेत्रदिपक यश विचारात घेवून त्यांचा विशेष गौरव कामगार कल्याण निधीमार्फत करण्यात आला.

**सन २००८-०९ :** या आर्थिक वर्षामध्ये रु. ३२.६० लाख संकलित निधीतून १०५ लाभार्थींना १५.७५ लाखाचे वारस अनुदान देण्यात आले. याशिवाय ६ सभासदांच्या पाल्यांना रु. १.१९ लाखाची शैक्षणिक कर्ज शिष्यवृत्ती देण्यात आली.

**सन २००९-१० :** या आर्थिक वर्षामध्ये रु. ३२.३९ लाख संकलित झाला आहे. या संकलित निधीतून कामगार कल्याण निधीच्या विहित उद्देशानुसार विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत.

याशिवाय प्रत्येक वर्षी विहित करण्यात आलेल्या बाबींच्या अनुषंगाने सभासद अधिकारी/सेवकांकडून गुणवंत कामगार पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येतात. यामधून पात्र होणाऱ्या अधिकारी/सेवकांच्या त्रयस्त समितीमार्फत मुलाखती घेवून गुणवंत कामगार म्हणून निवडण्यात येते. अशा गुणवंत अधिकारी/सेवकांचा नामवंत पाहुण्यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार प्रदान कार्यक्रम दरवर्षी आयोजित करण्यात येतो. या कार्यक्रमास महापालिका अधिकारी/सेवक व त्यांचे कुटुंबिय मोठ्या संख्येने सहभागी होतात. तसेच, कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमांमुळे सेवक व त्यांच्या कुटुंबियांशी संपर्क होवून विचारांची देवाणघेवाण होत आहे.

महापालिकेमध्ये गठित करण्यात आलेला कामगार कल्याण निधी व त्यातून राबविण्यात येणाऱ्या कल्याणकारी योजना यामुळे सेवकांना प्रोत्साहन मिळून त्यांच्या आणि पर्यायाने संस्थेच्या कार्यक्षमतेमध्ये निश्चितच वाढ होत आहे.